**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## स्टार्टअप इंडियाच्या दृष्टीने विद्यापीठात सुविधा पुरविण्याचा प्रयत्न - प्र-कुलगुरु
## स्टार्टअप इंडिया २०१८ चा समारोप संपन्न

अमरावती.

स्टार्टअप इंडिया २०१८ विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त उपक्रम विद्यापीठाच्यावतीने अल्पावधीत घेण्यात आला. पहिला प्रयत्न असला तरी सर्वांच्या सहकार्यामुळे यशस्वी ठरला. भविष्यात विद्यापीठात इनक्युबेशन सेंटर स्थापन करण्यात येईल, त्या माध्यमातून संशोधक विद्यार्थ्यांना आपले ड्रीम प्रोजेक्ट स्टार्टअपसाठी सादर करता येतील, असे प्रतिपादन विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर यांनी केले. यावेळी व्यासपीठावर सोमय्या विद्या विहार, मुंबई येथील इनोव्हेशन कॅटॅलिस्ट आणि बायोरिल्डीच्या प्रमुख कु. भावना पंड्या व स्टार्टअप इंडियाचे आयोजक सचिव डॉ. प्रशांत ठाकरे उपस्थित होते.

कु. भावना पंड्या यांनी मनोगत व्यक्त करतांना सत्तर स्टार्टअप सुरु करण्यात आल्याची माहिती दिली. पुढे म्हणाल्या, विद्यापीठात इनक्युबेशन सेंटर उभारण्यासाठी संस्थेतर्फे निश्चित मदत केल्या जाईल. यादृष्टीने विद्यापीठाशी लवकरच सामंजस्य करार करणार असून ज्या विद्यार्थ्यांचे ड्रीम प्रोजेक्ट असतील, त्यांना इनक्युबेशनच्या माध्यमातून मदत करण्याबाबत त्यांनी आश्वस्त केले.

यावेळी स्टार्टअप इंडिया स्पर्धेमध्ये मॉडेल्सचे उत्कृष्ट सादरीकरण प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये कॉम्प्युटर इंजिनिअरींग ॲण्ड इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी वर्गवारीत प्रो.राम मेघे इन्स्टिटट्युट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च, बडनेराचा लोकेश राजेश पोपट आणि मयुर राहूल सोनकुवर याला रु. दहा हजाराचे स्व. सुधाकरराव एस. धांडे स्मृति प्रित्यर्थ प्रथम पारितोषिक, तर प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंट, बडनेराचा रोशन पवार आणि वैष्णवी काकड हिला रु. पाच हजाराचे व्हिसाईट फ्रेश एंटरप्राईजेझ, अमरावतीच्यावतीने द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले. मेकॅनिकल, ऑटोमोबाईल ॲण्ड प्रॉडक्शन इंजिनिअरींग वर्गवारीत प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंट, बडनेराचा आकाश वाघ आणि दानिश खान याला रु. दहा हजाराचे पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंटच्यावतीने प्रथम पारितोषिक, तर एच.व्ही.पी.एम. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजीचा आकाश राजेंद्र नटकट याला रु. पाच हजाराचे डॉटकॉम इन्फोटेक प्रा.लि. अमरावतीच्यावतीने द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले.

सिव्हील, कन्स्ट्रक्शन ॲण्ड आर्किटेक्चर इंजिनिअरींग वर्गवारीत स्कुल ऑफ आर्किटेक्चर, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, अकोलाचा राहुल धामणे याला रु. दहा हजाराचे दि इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्स अमरावती लोकल सेंटरच्यावतीने प्रथम पारितोषिक, तर प्रो.राम मेघे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च, बडनेराचा आकाश आर. आकोलकर आणि सुमेध ए. गणेश याला रु. पाच हजाराचे दि इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्स अमरावती लोकल सेंटरच्यावतीने द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले. इलेक्ट्रीकल, इलेक्ट्रॉनिक्स, इन्स्ट्रमेन्टेशन ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग वर्गवारीत श्री संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, शेगांवचा तुषार झोंबाडे आणि शरद महल्ले याला रु. दहा हजारचे के.आय.टी.एस. टेक्नॉलॉजी लर्निंग सेंटर, अकोल्याच्यावतीने प्रथम पारितोषिक, तर प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंट, बडनेराचा अक्षय वगारे आणि हरिष वंजारी याला रु. पाच हजाराचे के.आय.टी.एस. टेक्नॉलॉजी लर्निंग सेंटर, अकोल्याच्यावतीने द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले.

केमिकल टेक्नॉलॉजी, टेक्सटाईल ॲण्ड एन्व्हार्यमेन्टल इंजिनिअरींग वर्गवारीत कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी अकोलाचा मुदासिर अहमद खान याला रु. दहा हजारचे दैनिक हिंदूस्थान न्युजपेपर, अमरावतीच्यावतीने प्रथम पारितोषिक, तर जवाहरलाल दर्डा इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, यवतमाळचा नितेश धैर्या आणि स्वप्नजा राऊत हिला रु. पाच हजाराचे लक्षकेम ऑर्गनाईज प्रा.लि., अमरावतीच्यावतीने द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले.

यावेळी विजय भट्टड, डॉ.पी.व्ही. इंगोले आणि विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करुन स्टार्टअप इंडिया उपक्रमामध्ये प्राप्त झालेल्या संधीवर प्रकाश टाकला. सुरुवातीला पाहुण्यांचे रोपटं देवून आयोजक सचिव डॉ. प्रशांत ठाकरे यांनी स्वागत केले व प्रास्ताविक भाषण करुन स्टार्टअप इंडिया प्रदर्शनी आयोजनामागील भूमिका सर्वांसमोर मांडली. संचालन डॉ. निरज घनवटे यांनी, तर आभार डॉ. प्रशांत गावंडे यांनी मानले. समारोप कार्यक्रमाला विद्यापीठातील शिक्षक आणि संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २३/०४/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी